# N 113

Seat No. [ ]

2018 III 03 1100 -N 113- MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

Time : 3 Hours (Pages 16) Max. Marks : 80

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :–**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेनानेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.

(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.


Previous Pathshala

**विभाग 1 : गद्य**


1. (अ) **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :**

(1) आकृतिबंध पूर्ण करा : 2

(i)




(ii)




P.T.O.

Previous Pathshala

परप्रांत, परदेश इथे होणाऱ्या तात्पुरत्या भेटीगाठी आणि त्यांतून उद्भवणाऱ्या गप्पा तर अधिकच सुंदर असतात. मी काही फार प्रवास केलेला नाही, पण लंडनला तीन आठवडे मी होते आणि नंतर अमेरिकेत महिनाभर होते. त्या परदेशप्रवासात अशा क्षणिक परिचयाचे व जवळिकीचे काही हृद्य अनुभव मला आले. लंडनमधल्या प्रसिद्ध ब्रिटिश म्युझियममध्ये हिंडता हिंडता पाय दुखू लागले म्हणून पायऱ्यांवर बसले असता, सुसंस्कृत इंग्रज माणूस जरा दूर पायऱ्यांवर येऊन बसला. इंग्रज लोक अबोल, दुरावा राखणारे असतात, असे ऐकले होते म्हणून आपण होऊन त्याच्याशी बोलावे असे धाडस मला करवेना. पण जरा वेळाने तोच माझ्याशी बोलू लागला. माझ्या पोशाखावरून माझे भारतीयत्व त्याने ओळखले असावे. त्यात त्याला वाचनाची खूप आवड होती. मग दोघांचे सूर जुळायला वेळ लागला नाही. डिकन्स, पी.जी. वुडहाऊस, हार्डी हे त्याचे आवडते लेखक होते. माझे वाचन त्याच्याइतके नसले, तरी हे लेखक थोडेबहुत मीही वाचलेले होते. गप्पा खूपच रंगल्या.

(2) योग्य पर्याय शोधून विधान पूर्ण करा :

(i) परप्रांत, परदेश इथे होणाऱ्या तात्पुरत्या भेटीगाठी आणि त्यांतून .................. 1

(1) उद्भवणाऱ्या घटना तर अधिकच सुंदर असतात.

(2) उद्भवणाऱ्या गप्पा तर अधिकच सुंदर असतात.

(3) उद्भवणाऱ्या गोष्टी तर अधिकच सुंदर असतात.

(4) उद्भवणाऱ्या कल्पना तर अधिकच सुंदर असतात.

(ii) कारण लिहा : 1

लेखिका व इंग्रज व्यक्ती यांचे सूर जुळले कारण ..................

Previous Pathshala

(3) (i) लिंग ओळखा : 1

(अ) कागद – ☐

(ब) आवड – ☐

(ii) खालील शब्दांचे सामान्यरूप ओळखून लिहा : 1

| मूळ शब्द | सामान्यरूप |
|---|---|
| (अ) प्रवासात | |
| (ब) पाय-यांवर | |

(4) प्रवासातील संवादाचे महत्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. 2

**(ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :**

(1) (i) चौकटी पूर्ण करा : 1

मातीत सिमेंट मिसळून बांधलेल्या घराची नागाच्या पिल्लांने सांगितलेली वैशिष्ट्ये → (i) ☐ → (ii) ☐

(ii) खालील कृतीचा परिणाम लिहा : 1

| कृती | | परिणाम |
|---|---|---|
| (अ) नागिणीच्या पिल्लांने घराबाबत विचार व्यक्त केले | (1) | .......................... |
| (ब) नागीण व तिची पिले अन्न मिळविण्यासाठी बाहेर फिरली | (2) | .......................... |

P.T.O.

Previous Pathshala

'पण माणसं बघ. त्यांच्याकडनं काही शिकायला नको का आपण प्राण्यांनी ? मुंग्यांना आपण सुचवूयात की, मातीत सिमेंट मिसळा योग्य प्रमाणात की, होतील आपली घरं परमनंट, अगदी माणसांच्या घरांसारखी. पाहिजे तर बाहेरनं वॉटर प्रूफिंगही करता येतं आजकाल. म्हणजे कितीही वेऊ देत पाणी, बाहेरच्या बाहेर वाहून जाईल. शिवाय ही वर तोंड केलेली उघडी भोकं, त्याने सगळा घोटाळा होतोय. ते डिझाईन पण बदलायला हवं ..........'

पोरांचे हे विचार ऐकून नागीण थक्क झाली. तिला भीतीच वाटली. ही पोरं माणसाच्या वळणावर जातात की काय ? ती म्हणाली, 'बाळा, तू माणसासारखं नको रे डोकं चालवू. बाहेर आपण अन्न मिळवायला फिरावं, तर ते दगड मारून हैराण करतात. खरं तर आपण उंदीर खाल्ले तर त्याला फायदाच आहे, हे नाही कळत त्याला. शेतात वारूळ आलं की धकतो नांगरून. खरं तर त्याचीच जमीन होते भुसभुशीत. आता या सिमेंटनं, डांबरी रस्त्यांनी कहर केलाय. जमिनीला होतच नाही सूर्याचं दर्शन. आपण राहायचं कुठं ? त्याला त्याच्याशिवाय कुठलेच प्राणी नको आहेत जगायला. अशी का चालते सृष्टी ? यात तो स्वत: मरणार आणि आपल्यालाही मारणार.'

(2) खालील विधाने सत्य वा असत्य ते लिहा : 2

(1) नागीण पोरांचे विचार ऐकून आश्चर्यचकित झाली. ...............

(2) जमिनीला सतत सूर्याचे दर्शन होते. ...............

(3) माणसाला सर्वच प्राणी जगायला हवेत असे वाटते. ...............

(4) माणसे वारुळावर दगड मारतात. ...............

Previous Pathshala

(3) (i) सहसंबंध शोधा : 1

(1) सापाचे : वारूळ : : पक्ष्याचे : ☐

(2) तो : ☐ : : वारूळ : नाम

(ii) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा : 1

(1) धनी = ..............................

(2) घर = ..............................

(4) 'आज्या, तू माणसासारखं नको रे डोकं चालवू' या नागिणीच्या वाक्यातून तुम्हाला कळलेला अर्थ 8 ते 10 वाक्यांत लिहा. 2

**(क) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :**

(1) (i) 1

माणसाला येणाऱ्या अनुभवांचे लेखकांनी वर्णन केलेले प्रकार

(1) ☐ (2) ☐

(ii) योग्य विधान निवडून लिहा : 1

लेखकांच्या मते माणसाच्या जीवनात अनुभवांचे फायदे ..............

(अ) माणसाला समृद्ध व शूर बनविणे.

(ब) माणसाला श्रीमंत व संपन्न करणे.

(क) माणसाला सहज शिक्षण देऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे.

(ड) माणसाला बुद्धिमान व प्रामाणिक बनविणे.

P.T.O.

Previous Pathshala

माणसाचे जीवन म्हणजे विविध प्रकारच्या अनुभवांची साखळी असते. हे अनुभव जसे शारीरिक तसेच बौद्धिक आणि भावनिक असतात. त्यांच्या प्रभावाने माणसाचे व्यक्तिमत्त्व घडत असते. काही अनुभव जीवनात सहजपणे येतात; पण काही अनुभव आपल्या इच्छेने, आपल्या जिज्ञासेच्या ओढीमुळे घेण्याची प्रवृत्ती माणसात असते. हे सर्व अनुभव माणसाचे एक प्रकारचे सहज शिक्षण करत असतात, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतात. या अनुभवांचा उपयोग जाणीवपूर्वक करून आपले व्यक्तिमत्त्व अधिक समतोल, अधिक संपन्न कसे करावे हे माहीत नसले तर कितीतरी महत्त्वाचे अनुभव वाया जातात. म्हणून, अनुभवांची योग्य पडताळणी करून, योग्य रचना करून, समतोल व्यक्तिमत्त्व घडविण्याची व्यवस्था करणे हे सुसंस्कृत समाजाचे कर्तव्य असते.

(2) 'विविध अनुभवांची साखळी माणसाचे व्यक्तिमत्त्व घडवते' या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा. 2

## विभाग 2 : पद्य

2. (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :

(1) चौकट पूर्ण करा :

(i) संत सोयराबाई यांनी संसाराला दिलेल्या दोन उपमा : 1

1 ☐ 2 ☐

(ii) 'जन्मोजन्मी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा : 1

Previous Pathshala

किती हें सुख मानिती संसाराचें।
काय हें साचें मृगजळ ॥ १ ॥
अभ्राची छाया काय साच खरी।
तैसीच हे परी संसाराची ॥ २ ॥
मी आणि माझें वागविती भार।
पुढील विचार न करतां ॥ ३ ॥
कां हे गुंतले स्त्रीपुत्रधना।
कां ही वासना न सुटे यांची ॥ ४ ॥
सोयरा म्हणे अंती कोण सोडवील।
फजिती होईल जन्मोजन्मीं ॥ ५ ॥

(2) घटक लिहून चौकटी भरा : 2

सांसारिक व्यक्ती ज्यात गुंतून राहते ते घटक

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(3) कोष्टक पूर्ण करा : 2

| संत कवयित्री | संप्रदाय | प्रस्तुत कवितेचा काव्यप्रकार |
|---|---|---|
| संत सोयराबाई | | |

(4) 'किती हे सुख' या अभंगातून व्यक्त केलेला संसाराबद्दलचा विचार तुमच्या शब्दांत लिहा. 2

P.T.O.

Previous Pathshala

**(ब) खालील कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :**

(1) हे केव्हा घडते ते लिहून हा तक्ता पूर्ण करा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) जेव्हा कवींचे बेचैनीचे भाव विरून जातात | (1) ........................ |
| (2) जेव्हा कवींचे मन रेंगाळते | (2) ........................ |

डोळ्यापुढती येतो जेव्हा आठवणीचा गाव
विरून जाती वाऱ्यावरती बेचैनीचे भाव
वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी
बाभळींच्या बनाशेजारी आंब्याची आमराई
गर्द सावली पहुडलेली वारा गातो अंगाई
हिरवेगार पीक नाचते काळ्याभोर शिवारी
रेंगाळते मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी
गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने
तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने

(2) खालील कोष्टक पूर्ण करा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| कवितेचा विषय | कवितेत कवींनी उल्लेख केलेल्या निसर्गातील गोष्टी |
| ........................ | ........................ |

Previous Pathshala

(3) रिकाम्या जागा भरून वाक्य पुन्हा लिहा : 2

(1) कवी अनिल पाटील यांच्या .................................... या काव्यसंग्रहाला ग.ल. ठोकळ पुरस्कार मिळाला.

(2) 'गाव' ही कविता .................................... या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

(4) तुमच्या कल्पनेतील गावाचे वर्णन 8 ते 10 वाक्यांत लिहा. 2

## विभाग 3 : स्थूलवाचन

3. कोणत्याही दोन कृती सोडवा : 4

(1) रेवन्त आणि अनाहिता यांना अम्मा यांनी केलेला उपदेश

- जलस्रोतांचे महत्त्व
- पुस्तकांचे महत्त्व

(2) खालील मुद्द्यांच्या आधारे पंढरपूरचे महत्त्व स्पष्ट करा :

(1) पंढरपुरातील दुकाने

(2) चंद्रभागेचे स्नान.

(3) सविस्तर कारण लिहा :

↓

चिनार व जुई यांना झाड व्हावेसे वाटते कारण –



Previous Pathshala

## विभाग 4 : व्याकरण

4. (अ) वर्गीकरण करा : 2

पालापाचोळा | द्विगू समास

वैकल्पिक द्वंद्व | गुरुशिष्य | त्रिनेत्र

इतरेतर द्वंद्व | समाहार द्वंद्व समास | योग्यायोग्य

Previous Pathshala

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| समासाचे नाव | सामासिक शब्द |
| | |
| | |
| | |
| | |

(ब) कंसातील सूचनेनुसार वाक्यांत बदल करा : 2

(i) वसंत ऋतूचा आनंद साजरा करायचा. (आज्ञार्थी करा.)

(ii) एकांतवासात माणूस एकटा नसतो. (प्रश्नार्थी करा.)

Previous Pathshala

(क) (i) चौकटीतील शब्दाचे दोन अर्थ लिहा : 1

| | | |
|---|---|---|
| ← | रवी | → |

(ii) पुढील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा : 1

(अ) भाषण करणारा – ......................................

(ब) कमी बोलणारा – ......................................

(ड) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा : 1

निसर्गाला धर्म असलाच तर जगा आणि जगू द्या एवढाच असू शकतो

(इ) खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा : 1

माझ्या वैयक्तीक जीवनाच्या निराशेतही जगण्याची 'आशा' टिकुन राहिली.

(फ) (i) खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखा व त्याचा वाक्यात उपयोग करा : 1

सतारीच्या प्रसन्न सुरांनी वातावरण मोहरून टाकले.

(ii) खालील पर्यायांमधून वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधून लिहा : 1

(1) मूठमाती देणे ......................................

(अ) मूठभर देणे

(ब) माती करणे

(क) नष्ट करणे

(2) कहर करणे ......................................

(अ) अतिरेक करणे

(ब) आवाज करणे

(क) व्यवसाय करणे

P.T.O.

Previous Pathshala

## विभाग 5 : उपयोजित लेखन

5. (अ) (1) **पत्रलेखन :** 5

'वाचनम् हितकारकम्।'
सचिन बुक डेपो, अकोलातर्फे
वाचन प्रेरणा दिनानिमित्त
पुस्तकांचे भव्य प्रदर्शन

स्थळ
अलंकार
सभागृह
अकोला

सवलतीच्या दरात पुस्तक विक्री

कालावधी
10 ते 14 ऑक्टो.

उद्घाटन

10 ऑक्टो. 2018, सायं 4 वाजता

उद्घाटक – डॉ. स.अ. गावडे
(प्रसिद्ध लेखक)

शाळाप्रमुख या नात्याने

'वाचन प्रेरणा दिन' यादिवशी पुस्तकांचे वाचन करण्यासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

खरेदी केलेल्या पुस्तकांवर सवलत न मिळाल्याची तक्रार संबंधित अधिकाऱ्या-कडे करा.

(2) पुढील मुद्द्यांवर आधारित कथा पूर्ण करा (शब्दमर्यादा 80 ते 100) : 5

सीमा हुशार मुलगी – हलाखीची परिस्थिती – कष्ट करून शिक्षण – शाळेत सुंदर हातांची स्पर्धा – वर्गातील सर्वांचा स्पर्धेत सहभाग – सर्वांचे सजलेले हात – सीमा निराश – परीक्षकांचा निकाल – कष्ट करणारे हात सुंदर – सीमा विजयी.

Previous Pathshala

(3) खालील उतारा वाचून त्यावर **पाच** प्रश्न असे तयार करा की ज्याची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात येतील : 5

जपानचे हवामान काहीसे भारतासारखेच आहे. ऋतूंचे कालखंड मात्र भारतापेक्षा वेगळे आहेत. जुलैच्या अखेरीस उन्हाळा सुरू होतो आणि त्यानंतर महिनाभराने पावसाळा सुरू होतो. सप्टेंबर हा पावसाळ्याच्या उच्चांकाचा महिना असतो. पावसाबरोबरच चक्री वादळांनी ही बेटे झोडपली जातात. जपानच्या उत्तर भागात हिवाळ्यात जोराची वर्फवृष्टी होते. टोकियोच्या आसपास मात्र हिवाळा एवढा कडक नसतो. मार्च-नंतरचे तीन-चार महिने जपानला भेट देण्यासाठी उत्कृष्ट असतात. या वेळी हवामान सुखद असते. जपानमध्ये आधीच झाडे, वेली व जंगले मुबलक, त्यातच उत्तम सौंदर्यदृष्टीच्या जपानी लोकांनी लक्षावधी फुलझाडांची जाणीवपूर्वक केलेली लागवड आणि खास जपानी धर्तीची उद्याने, यांमुळे हा देश अतिशय लोभसवाणा दिसतो. जंगलांप्रमाणेच भरपूर पर्वत या देशाला मिळाले आहेत.

**(ब) खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा (तीनपैकी 2) :** 10

(1) **संवादलेखन (शब्दमर्यादा 60 ते 80) :** 5

नूतन भारत विद्यालयातर्फे

इ. 10वीच्या विद्यार्थ्यांसाठी

दिवाळीच्या सुट्टीत

शैक्षणिक सहलीचे आयोजन

महाबळेश्वर व भिलार गाव

शैक्षणिक सहलीची सुवर्ण संधी

मर्यादित

नाव नोंदणी आवश्यक

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

वरील निवेदन वाचून तुम्ही आणि तुमचे वडील यांच्यामध्ये घडलेला संवाद 60 ते 80 शब्दांत लिहा.



Previous Pathshala

(2) 'भ्रमणध्वनी शॉपी' ची आकर्षक जाहिरात तयार करा. 5

(3) खालील उताऱ्याचा एक-तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा : 5

घराच्या सभोवार खूप जागा होती. तिथं फुलझाडं लावायची, आंबा, नारळ, फणस यांसारखी मोठी झाडं लवायची आमची हौस आम्ही पुरवून घेतली. पहिली काही वर्ष जमीन चांगली होती, त्यामुळे काहीही पेरलं तरी लगेच उगवायचं. पावसाळ्यात तर पाय ठेवू तिथं तुळस उगवलेली असायची. केशरी, पिवळ्या, गोंडेरी झेंडूची फुलं तर इतकी यायची की ते रंग बघून मन अगदी भरून जायचं. जमिनीला बराच उतार असल्यानं माती धुपत होती. नंतर जमिनीचा कस कमी होऊ लागला. तरीही आम्ही नवीन काहीतरी लावायचो. एकदा तर रताळी, भुईमूगही लावला. घरात काही खाऊ मिळाला नाही की परसात जायचं, जमीन जरा कोयत्यानं उकरायची की सात-आठ शेंगा सहज मिळायच्या. त्या खायला खूप मजा यायची. एकदा तर मागच्या बाजूला आपोआप कसला तरी एक वेल उगवला. तो मोठा झाला आणि त्याला एक मोठ्ठं फळ आलं. त्याचा घमघमाट सुटला! ते फळ होतं चिबुडाचं.

Previous Pathshala

(क) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा (तीनपैकी 1) (शब्दमर्यादा 80 ते 100) : 5

(1) माझा आवडता छंद : 5

खालील मुद्द्यांच्या आधारे **माझा आवडता छंद** याविषयावर निबंधलेखन करा.

(1) छंद म्हणजे काय

(2) छंदाचे प्रकार

(3) आवडता छंद


(4) आवडण्याचे कारण

(5) छंद जपण्यासाठी प्रयत्न

(6) फायदे.

(2) खालील मुद्द्यांच्या आधारे निबंधलेखन करा : 5

मी पक्षी झाले/झालो तर ......................




P.T.O.

Previous Pathshala

(3) **आत्मकथन :** 5

खालील घटकाचे आत्मकथन लिहा :




* विद्यार्थ्यांना उपयुक्त
* विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी
* विद्यार्थी निष्काळजीपणाने वागतात
* दु:ख, सन्मानपूर्वक वागणुकीसाठी अपेक्षा.

Previous Pathshala

Previous Pathshala